# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा-२०१५

## - अंतिम निकाल –

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 11 ऑक्टोबर, 2015 रोजी घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा 2015 च्या एकूण 1435 पदांचा अंतिम निकाल उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील गुणवत्ता क्रम त्यांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहून दि. **30 जुलै, 2016** रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेमधून मु. पो. बाभळगांव, लातूर येथील श्री. सुजित शिवाजी जाधव (LT004409) हे राज्यात प्रथम आले आहेत. तसेच करवीर, कोल्हापूर येथील श्री. खतकर रविराज एकनाथ (KL004419) हे मागासवर्गीयांमधूनही प्रथम आले असून महिलांमध्ये मु. पो. सातारा रोड, सातारा येथील श्रीमती फाळके शितल अशोक (ST002343) ह्या प्रथम आल्या आहेत.

2. गुणवत्ताधारक खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस त्यांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी तपासण्याच्या व अशा तपासणीत तो पात्र ठरण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे.

3. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत आयोगाकडे online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

ठिकाण : मुंबई

दिनांक : 30 जुलै, 2016.

**सु. सं. केसरकर**
**उप सचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**